International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# भारतातील सहकार चळवळ

**प्रा. डॉ. अमृता गणपती मगदुम**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड ताकागल. जिकोल्हापूर. राज्य महाराष्ट्र .शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.
***Corresponding Author- प्रा. डॉ. अमृता गणपती मगदुम***
Email-agmagdum111@gmail.com.

**घोषवारा :**

आर्थिक विकासात सहकार चळवळीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रचलित काळात आर्थिक विकासाचा व्यापक दृष्टिकोनातून विचार केला जातो .भौतिक कल्याणात सतत वाढ होत जात ,म्हणजेच आर्थिक विकास होत जातो,असे रीचडसन त्यांचे मत आहे .प्रत्यक्षपणे विचार केल्यास आर्थिक विकास ही आर्थिक नियोजनावर आधारित महत्त्वपूर्ण क्रिया आहे .आर्थिक विकासात नियोजनाला महत्त्वाचे स्थान आहे.आर्थिक विकासामध्ये सरकारी क्षेत्र ,खाजगी क्षेत्र आणि सहकार क्षेत्रात प्रमुख भूमिका पार पाडावी लागते विशेषता विशेषत सरकारी आणि खाजगी क्षेत्रापेक्षा सहकार क्षेत्रास प्रमुख भूमिका पार पाडावी लागते.विशेषता सरकारी आणि खाजगी क्षेत्रापेक्षा सहकार क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे. कारण सहकार चळवळ ही जनतेची ,जनतेच्या विकासासाठी, समानतेच्या तत्त्वावर येऊन विकासासाठी प्रयत्न करणारी चळवळ आहे .म्हणूनच सहकार चळवळ महत्त्वाची आहे.

**प्रस्तावना :**

ग्रामीण अर्थव्यवस्थेतील विकासामध्ये सहकार चळवळीचे महत्त्व स्पष्ट झालेले आहे .देशात सहकारी चळवळीचा धोरणात्मक विकास आणि वाटचाल ही सहकार चळवळीच्या प्रभावी नेतृत्वामुळेच होऊ शकली असे समजण्यास आणि मानण्यास हरकत नाही .सहकार चळवळीत सरकारची मदत मिळाली. तथापि नेतृत्वामुळे त्या मदतीचा चांगल्या प्रकारे उपयोग करून घेता आला म्हणून सहकार चळवळीचे नेतृत्व हे देशातील सहकारी चळवळीचे नेतृत्व हे सहकारी संस्थांच्या विकासाला साह्यभूत ठरले असे म्हणावे लागते. देशातील सहकार चळवळीस सुयोग्य नेतृत्व लाभल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला विविध सहकारी संस्था स्थापन करून चालना मिळावी म्हणून सहकार चळवळीच्या नेतृत्वाचा विचार करणे गरजेचे आहे .सहकार चळवळीच्या नेतृत्वास जर व्यवस्थापन शास्त्राची जोड देऊन सहकार चळवळीच्या नेतृत्वाचा विचार केल्यास सहकार चळवळीच्या नेतृत्वाचे फायदे मिळतील.

**बीज संज्ञा:** सहकार, सहकार विकास आणि वृद्धी, सहकार चळवळ

**उद्दिष्टे :**

1. भारतातील सहकार चळवळीचे यशापयश अभ्यासणे.
2. भारतातील सहकार चळवळीचे मूल्यमापन करणे.
3. स्वातंत्र्योत्तर काळातील सहकार चळवळीच्या विकासाचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :** सदर शोधनिबंध साठी दुय्यम सामग्री चा आधार घेतला असून यात प्रकाशित संदर्भ ग्रंथांचा, लिखित पुस्तके ,मासिके ,संशोधन

पेपर यांच्यातून माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील सहकार चळवळीचा विकास :**

भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातील उपलब्ध साधनसामग्रीचा महत्त्व उपयोग करून घेण्यासाठी नियोजनाच्या माध्यमातून आर्थिक विकासाचे लक्ष्य निश्चित केले. आर्थिक नियोजन म्हणजे सर्व अर्थव्यवस्थेचा तपशीलवार आढावा घेऊन कोणते आणि किती प्रमाणात उत्पादन करावयाचे कसे , केव्हा आणि कोठे उत्पादन करावयाचे आणि ते कशाप्रकारे वाटावे या सारखे महत्त्वाचे निर्णय निश्चितच या सत्तेने जाणीवपूर्वक घेणे म्हणजे नियोजन होय. भारतीय आर्थिक नियोजनाचे उद्देश पूर्ण करण्यासाठी भारतीय नियोजन आयोग ,रिझर्व बँक ऑफ इंडिया इत्यादींनी सहकार क्षेत्रास मोठ्या प्रमाणात मदत केली. देशाच्या आर्थिक नियोजनाची उद्देश आणि सहकारी क्षेत्राचे उद्देश हे जवळपास सारखेच आहेत. सहकारी क्षेत्राच्या माध्यमातून अनेक सहकारी संस्थांची निर्मिती आणि आर्थिक परिवर्तनातील सहकारी संस्थांची भूमिका विचारात घेऊनच कृषी लघु उद्योग, कृषी मालाचे विपणन ,कृषिमालाचे वितरण आणि पुरवठा इत्यादी क्षेत्रांमध्ये सहकाराचा प्रभाव आणि विस्तार मोठ्या प्रमाणात झाला .पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून खालील सहकारी संस्थांच्या विकासाकडे अधिक लक्ष देण्यात आले. त्याचबरोबर भारतीय आर्थिक नियोजनामध्ये पुढील उद्देश निश्चित करण्यात आले.

1) भारतीय अर्थव्यवस्थेत क्रांतिकारी बदल घडवून आणणे.

2) देशातील उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा महत्तम उपयोग करणे.

3) देशाचा संतुलित औद्योगिक विकास करणे.

4) देशातील शेतीच्या उत्पादकतेमध्ये वाढ करणे आणि त्यासाठी नवीन तंत्राचा वापर करणे.

5) देशातील दारिद्र्याच्या दुष्टचक्राला आळा घालून दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण कमी करणे.

6) देशाच्या राष्ट्रीय उत्पादनात आणि पर्यायाने दरडोई उत्पादनात वाढ करणे.

7) देशात आर्थिक आणि सामाजिक समता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.

8) देशातील जनतेला सामाजिक सुरक्षितता देऊन त्यांच्या जीवनात स्थैर्य निर्माण करणे.

9) देशाने आर्थिक क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने नियोजन करणे.

10) देशाच्या आर्थिक उत्पादनाचे आणि संपत्तीचे न्याय वितरण करण्यासाठी कल्याणकारी योजना राबवणे.

11) देशातील विविध मागास भागांचा शोध घेऊन मागास क्षेत्राच्या आर्थिक विकासाकडे लक्ष केंद्रित करणे.

12) देशाच्या आर्थिक विकासाचा वेग वाढवणे.

13) सहकारी वित्तीय संस्था आणि प्रक्रिया संस्था स्थापन करून त्यात सदृढता आणणे.

14) सहकारी विपणनाचे प्रभावी जाळे निर्माण करणे.

15) सहकारी विविध वस्तू भांडाराची स्थापना करून जीवनावश्यक गरजा पूर्ण करणाऱ्या वस्तुंचा पुरवठा करणे.

16) सहकारी ग्राहक विकास संस्था स्थापन करणे.

17) सहकारी समित्या ,सहकारी बँका आणि सहकारी विभाग यांना सर्व साहाय्य करून त्या संस्थांच्या आर्थिक स्थितीत सदृढता निर्माण करणे.

18) विज्ञान सर्वांना व्हावे म्हणून सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षणाची व्यवस्था करणे. वरील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचा विकास स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मोठ्या प्रमाणात झाला. भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संतुलित आर्थिक विकासाच्या अनुषंगाने पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक विकासाचा पाया रचण्यात सुरुवात केली.

**सहकार चळवळीचे फायदे :**

सहकार चळवळ ही प्रभावीपणे राबविल्यास सहकार चळवळीच्या आर्थिक, शैक्षणिक व नैतिक ,सामाजिक लाभ पुढील प्रमाणे होतील.

**आर्थिक लाभ फायदे**

1) सहकारामुळे ग्रामीण भागातील सावकारकी पद्धती बंद होऊन ग्रामीण भागातील जनतेला कमी दराने कर्ज पुरवठा करण्यात येतो.

2) भारतीय अर्थव्यवस्था ही सहकाराच्या माध्यमातून सूत्रबद्ध पद्धतीने विकसित करण्यात आली .आज पन्नास ते साठ टक्के ग्रामीण कर्ज पुरवठा हा सहकारी संस्थांच्या माध्यमातून करण्यात येतो.

3) ग्रामीण भागात सहकारी पतसंस्था बँकांची स्थापना करण्यात आल्याने ग्रामीण भागातील जनतेला बचतीच्या सवयी लागल्या.

4) अनेक प्रकारच्या लघु व कुटीरोद्योग यांमध्ये सहकारी क्षेत्राचाच प्रभाव निर्माण झाला .अनेक बलुतेदार व्यवसाय करणाऱ्यांच्या व्यवसायाच्या सहकारी संस्थांमध्ये रूपांतर झाले आहेत.

5) सहकारी संस्थांना कर्ज देताना उत्पादक कार्जाला प्राधान्य दिल्याने कर्जाचा उचित कारणासाठी उपयोग होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

6) सहकार चळवळीने देशात हरितक्रांती घडवून आणण्यास मदत केली. शेतीच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करून शेती विकासाचे तंत्र लोकप्रिय केले.

7) कृषिमालाच्या विपणनातील दोष शेतकऱ्यांची होणारी फसवणूक आणि पिळवणूक यास पायबंद म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदी विक्री संघ स्थापन करून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचा पाया घातला.

8) कृषी उत्पादित मालावर प्रक्रिया करणारे अनेक उद्योग साखर कारखाने, सूतगिरण्या इत्यादींमुळे ग्रामीण विकास आणि शेतकऱ्यांचा आर्थिक कायापालट झाला.

9) विविध वस्तू मधील भेसळ टाळणे ,वस्तूची गुणवत्ता, वाजवी किंमत आणि ग्राहकांचे कल्याण साधण्यासाठी ग्राहक भंडाराच्या माध्यमातून जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणा मुळे व्यक्तींचा आर्थिक कल्याण आणि जीवनमान उंचावण्यास मदत झाली.

10) सहकार चळवळ ही सभासदांच्या आर्थिक उद्धारासाठी स्थापन झालेली स्वयंस्फूर्त सहकारी चळवळ असल्याने सभासद प्रामाणिकपणे विकासासाठी प्रयत्न करतात.

**शैक्षणिक फायदे**

1) ग्रामीण जनतेला वेगवेगळया प्रकारचे शिक्षण देण्यात येते.

2) जनतेला आर्थिक बचत, काटकसर ,सेवा तत्व ,समान उद्दिष्टांसाठी एकत्र येऊन आर्थिक विकास करावयाचे शिक्षण प्राप्त होते.

3) सहकाराच्या माध्यमातून अनेक संस्थांची निर्मिती करण्यात आली. त्याद्वारे प्रशिक्षित कर्मचारी , प्रगत वर्ग निर्माण करण्यास मदत होते.

4) सहकाराच्या माध्यमातून एकत्र येऊन आर्थिक विकासासाठी प्रयत्न करण्याचे आणि संघटित होऊन अपेक्षित ध्येय गाठण्याचे प्रशिक्षण, शिक्षण सहकारामुळे मिळते.

5) सहकारी चळवळीमुळे सभासदांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाल्याने त्यांच्या

व्यक्तिमत्त्वामध्ये सामाजिक दर्जा उंचावल्याने बदल होऊन स्वावलंबन, नैतिकता ,चारित्र्य काटकसरीचे शिक्षण प्राप्त होते.

क सामाजिक आणि नैतिक लाभ

1) समाज जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचे काम सहकार चळवळीने केले.

2)सहकारी संस्थेच्या गतिमान नेतृत्वामुळे सभासदांच्या सामाजिक सुधारणांना गती मिळाली.

3) सहकार चळवळीत राहुल नेतृत्व करता येते त्यामुळे सामाजिक दृष्टीने त्यांचे महत्त्व वाढते.

4) सहकार चळवळीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कलह, मतभेद दूर करून वैचारिक समानता इत्यादी बाबींवर समाज हा सामाजिक व नैतिक दृष्ट्या एकत्रित आला आणि देशाचा पाया रचण्यात आला.

5) सहकारी संस्थेचे सभासद चारित्र्यवान आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेला असतो .या विचारातून सामाजिक आणि नैतिक पाया चांगला निर्माण झाला.

**राजकीय फायदे :**

सहकार चळवळ ही मुळातच लोकशाही चळवळ आहे या चळवळीचे राजकीय फायदे पुढीलप्रमाणे.

1) सहकारी संस्थांचा पाया हा लोकशाही व्यवस्थेवर अवलंबून असतो. त्यामुळे लोकशाही प्रणाली चे धडे सभासदांना सहकारी संस्थेच्या माध्यमातून मिळतात .

2) लोकशाही च्या माध्यमातून सत्तेवर आलेले कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात संस्थेमध्ये असतील तर सहकार चळवळीच्या विकासाकडे विशेष लक्ष देण्यात येते ,सहकार चळवळीचा विकास त्यामुळे होऊ शकतो .

3) राजकीय व्यक्ती आणि सत्तेच्या माध्यमातून सहकार्यासाठी भरीव आर्थिक तरतूद करून या चळवळीचा विकास साधला जातो.

**भारतातील सहकार चळवळीच्या प्रभावी वाढीसाठी उपाय योजना :**

1) सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बचतीचे प्रमाण वाढवण्याचे निश्चित उद्दिष्ट प्रतिवर्षी ठरवून देण्यात यावे.

2) सहकार चळवळीची भूमिका आणि सरकारची भूमिका विसंगत राहू नये. यासाठी योग्य नियम करणे आवश्यक आहे.

3) सहकाराचे शिक्षण आणि प्रशिक्षणाची प्रभावी यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.

4) सहकारासाठी प्रभावी कार्यक्षम अंकेक्षण व देखरेख यंत्रणा निर्माण करावी.

5) अनावश्यक खर्च टाळण्यासाठी नियम करून द्यावेत.

6) सरकारने सहकारी संस्थांसाठी पोषक वातावरण निर्माण करून द्यावे व सहकारी संस्थांच्या कायद्यात हस्तक्षेप टाळावा.

7) सहकारी संस्थांच्या कर्ज बाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी उत्पादक स्वरूपाचाच कर्जावर भर देण्यात यावा.

8) सहकारी संस्थांतील राजकीय हस्तक्षेपास प्रतिबंध असावा.

9) सहकार क्षेत्रास स्वतंत्र क्षेत्राचा दर्जा देण्यात यावा.

10) सहकार क्षेत्रासाठी नवीन राष्ट्रीय सहकारी धोरण जाहीर करावे.

**निष्कर्ष :**

1) खुल्या अर्थव्यवस्थेत टिकण्याची शक्ती व संभाव्यता सहकारी क्षेत्रात निश्चितपणे आहे.

2) सहकार चळवळीत काम करणारा कार्यकर्ता, प्रामाणिक, मनमिळावू आणि विकासोत्सुक असेल तर ही चळवळ प्रभावी पद्धतीने कार्य करू शकेल.

3) सहकार क्षेत्राची आर्थिक-सामाजिक साधनसामग्री, मनुष्यबळ शक्ती इतर क्षेत्रांपेक्षा खूप मोठी आहे.

**संदर्भ :**

1) सहकाराचा विकास : प्रा. डॉ.सी.जे. जोशी ,प्रा. के.सी .जोशी

2) सहकाराची मूळ तत्त्वे : व्ही. टी.चौगुले ,के. जी. पठाण

3) सहकार : डॉ. गंगाधर कायंदे - पाटील

4) सहकारजगत मासिक

5) सहकार विश्व मासिक